# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २७/०७/२००६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक २७/०७/२००६ रोजी सभा सुचना क्र. ०९ दि. २१/०७/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. मिलन गोविंदराव पाटील | सदस्य |
| ५) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ६) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| ७) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ८) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| ९) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| १०) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ११) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| १२) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| १३) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| १४) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| १५) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| १६) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |

**मा. सभापती :-**

आजच्या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि मनपा कर्मचारी वर्ग यांनी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडण्यास मला सहकार्य करावे अशी मी विनंती करतो आणि सचिवांनी सभेला सुरुवात करावी अशी मी सुचना करतो.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**मिलन पाटील :-**

साहेब, सभेला सुरूवात होण्यापुर्वी मी बोलू इच्छितो की, आपल्या महानगरपालिकेची आजची पोझीशन काय आहे? याची आम्हाला माहिती द्या. मला असे विचारायचे आहे की, काल जे कॉन्ट्रॅक्टर जमलेले होते. त्या ठेकेदारांनी तुमच्या बरोबर चर्चा केलेली होती. आज त्या ठेकेदारांचे रु. २३ कोटी देणे बाकी आहे. आपली म्युनिसिपाल्टी याच्यावर काय कार्यवाही करणार आहे? ते सांगा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

परंतु, सध्या ठेकेदारांचा विषय नाही. ज्या कॉन्ट्रॅक्टर लोकांची बिले पेन्डीग आहेत त्यांनी संबंधित बिलाच्या चौकशीसाठी आयुक्त साहेब किंवा अकाऊंटन्टकडे जायला पाहिजे. परंतु, ते कॉन्ट्रॅक्टर सगळ्या केबीनमध्ये फिरत असतात हे योग्य नाही. आपण याच्यावर नेमकी काय कार्यवाही करायला पाहिजे? ते लक्षात घ्या.

**जयंत पाटील :-**

जर कॉन्ट्रॅक्टरचे देणे बाकी असेल तर तुम्ही ते दिले पाहिजे.

**मिलन पाटील :-**

प्रथम आपल्याला आपल्या म्युनिसिपाल्टीची आजची परिस्थिती कशी आहे ते बघावे लागेल. कारण जर आपल्याकडे पैसे असतील तरच आपण कॉन्ट्रॅक्टरना पैसे देणार आहोत. आपल्याकडे बिले वसुल केली जातात की, वसुल केली जात नाही? मा. उपायुक्त साहेब, आपल्या म्युनिसिपाल्टीची नेमकी काय परिस्थिती

आहे ते सांगा. आपल्याकडे ऑक्ट्रॉयचे पैसे येत नाहीत की, नक्की काय परिस्थिती आहे? याची माहिती मागवली असती तर बरे झाले असते.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, प्रत्येक वेळेला हा विषय येत असतो. मागच्या वेळेला महापालिकेचे काही चेक बाऊन्स झाल्याचे निदर्शनास आलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील यांनी ठेकेदारांबाबत योग्य मुद्दा मांडलेला आहे. परंतु, काही ठेकेदार अतिशय निकृष्ट दर्जाचे काम करतात असे माझ्या निदर्शनास आलेले आहे.

**गजानन भोईर :-**

काही ठेकदार कामचं करत नाहीत असेसुद्धा आढळून येते.

**केशव घरत :-**

साहेब, मला या ठिकाणी असा विषय मांडायचा आहे की, मी वृक्ष प्राधिकरण समितीला दि. १७/०५/२००६ रोजी एक पत्र दिलेले होते. त्या पत्राचे काय झाले?

**मोहन पाटील :-**

सचिव साहेब, मी मागच्या वेळेला बजेटच्या विषयावर आढावा द्यायला सांगितलेले होते. त्याचे काय झाले?

**गजानन भोईर :-**

हा विषय मागच्या वेळेलासुद्धा आलेला होता.

**मोहन पाटील :-**

मी मागच्या वेळेला संबंधित विषयाचा आढावा घेण्याबाबत विषय घेतलेला होता. पुढच्या मिटींगला बजेटच्या आढाव्याचा विषय घ्या आणि त्याच्यावर चर्चा करा.

**गजानन भोईर :-**

मा. सभापती साहेब, माझा दुसरा बाजार लिलावाचा विषय होता. बाजार लिलावाचे टेंडर निघून महिना झालेला आहे. शिवाय, आपण त्यांना एक महिन्याची मुदतवाढ दिलेली होती त्याचे काय झाले?

**मोहन पाटील :-**

मग त्याचं नुकसान कोण भरुन देणार?

**गजानन भोईर :-**

परंतु, आत्ता बाजार लिलावाची मुदतवाढ संपलेली आहे. जर तुम्हाला बाजार लिलावासाठी परत मुदतवाढ द्यायची असेल तर एक वर्षाचीच द्या. बाजार लिलावाच्या विषयाचे पुढे काय झाले? बाजार लिलावाच्या विषयावर नक्की काय निर्णय झाला ते मा. उपायुक्त साहेबांनी सांगावे.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही बाजार लिलावाशी संबंधित अधिका-यांना मिटींगला बोलवा. साहेब, आम्ही नगरपालिकेच्या फायद्यासाठी रु. अडीच कोटीचा विषय काढलेला होता, त्याचे सार्थक झाल्यासारखे वाटते.

**रतन पाटील :-**

स्थायी समितीच्या अनेक मिटींगमध्ये टेम्पो स्टॅन्ड हलविण्या संदर्भात ब-याच वेळेला गाजावाजा झालेला होता. आता महापालिकेच्या वतीने श्री. खतगावकर साहेबांच्या प्रयत्नाने, सर्व सन्मा. सदस्यांच्या अथक प्रयत्नाने आणि स्थायी समितीच्या जास्तीत जास्त प्रयत्नाने टेम्पो स्टॅन्ड हलविण्यात आलेला आहे. विशेषतः याचा लाभ इतर नागरिकांना मिळेल आणि संबंधित टेम्पो स्टॅन्ड जवळील वाहतुक सुरळीतपणे होईल अशी आशा आहे. दुसरी गोष्ट अशी आहे की, कुठल्याही पध्दतीचा त्रास होणार नाही अशा पध्दतीने डिव्हायडरचे काम चालू आहे किंवा ज्या ठिकाणी डिव्हायडर टाकलेले आहेत त्या ठिकाणची वाहतुक चालू करण्यात यावी अशी मी मा. सभापती साहेब आणि मा. उपायुक्त साहेबांना विनंती करतो. ही अत्यंत अभिमानास्पद गोष्ट झालेली आहे. त्यामुळे मी पुन्हा एकदा मा. सभापती साहेब आणि श्री. खतगावकर मा. उपायुक्त साहेब यांचे अभिनंदन करतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

टेम्पो स्टॅन्ड हलविण्यासाठी कार्यकारी अभियंता श्री. दिपक खांबित यांचा सिंहाचा वाटा असल्यामुळे मी त्यांचेसुध्दा अभिनंदन करतो.

**प्रभात पाटील :-**

साहेब, मला या ठिकाणी अजुन एक प्रश्न मांडायचा आहे की, भाईंदर-पूर्व आणि भाईंदर-पश्चिमेला जोडणा-या सबवेचे काम कुठपर्यंत झालेले आहे?

**जयंत पाटील :-**

सबवेचे काम आपल्या हद्दीतील असल्यामुळे आम्हाला त्या कामाची माहिती घेण्याचा अधिकार आहे.

**दिपक खांबित :-**

आपण भाईंदर (पूर्व) आणि भाईंदर (पश्चिम) च्या सबवेचे एस्टिमेट तयार करुन ठेवलेले आहे आणि ते एस्टिमेट रेल्वेकडे मंजुरीसाठी पाठवलेले आहे. येत्या महिनाभरात त्याची मंजुरी मिळेल, त्याच्यानंतर टेन्डर काढून आपल्यालाच काम करायचे आहे. आपण पूर्वी रेल्वेकडे पैसे भरायचो आणि रेल्वेवाले काम करायचे. परंतु, आपल्याला रेल्वेवाल्यांनी आता अशी मंजुरी दिलेली आहे की, आम्ही तुम्हाला मदत करु. तुम्हीच टेन्डर काढायचे आणि तुम्हीच काम करायचे आहे, असे त्यांनी सांगितलेले आहे. आता आपल्याला यासाठी रेल्वेची मंजुरी घ्यावी लागेल.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही सबवेचे काम पुर्ण करुन घ्या.

**गजानन भोईर :-**

मग ते सबवेचे काम चालू होते ते बंद का झाले?

**दिपक खांबित :-**

सबवेचे काम चालू आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

श्री. खतगांवकर साहेब, दुसरी गोष्ट अशी आहे की, भाईंदर (पश्चिम) पोलिस चौकी ते उत्तनच्या रोडचे काम पास झालेले आहे. तुम्ही त्याचे टेन्डर कधी काढणार आहात? आणि ते काम कधी सुरु करणार आहात ते सांगा.

**दिपक खांबित :-**

आपण त्या कामाचे एस्टिमेट तयार केलेले आहे. आपण त्या कामाची पुढच्या बजेटमध्ये तरतुद करुन ते काम सुरु करायचे आहे. त्याच्यासाठी अंदाजे रु. ३० ते रु. ४० कोटीचा खर्च होण्याची शक्यता आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, बाजार लिलावाच्या विषयाचे काय झाले?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी या ठिकाणी मा. सभापती साहेबांच्या वतीने खुलासा करु इच्छितो की, आपण आज जी बैठक आयोजित केलेली आहे, ती कामकाजाची बैठक आहे की, जनरल बैठक आहे ते सांगा आणि जर तसे काही असेल तर आज त्याबाबत प्रस्ताव होऊ द्या. आपण याबाबत संबंधीत डिपार्टमेन्टला कळवू आणि पुन्हा रिव्ह्यु चालू ठेवू. अमुक विषयाचे काय झाले? तमुक विषयाचे काय झाले? असे आपण सिनियर असल्यामुळे बोलू शकत नाही. सभेपूर्वी ज्या काही प्रोसेस होतात. त्या प्रोसेसचे गांभीर्य असणे आवश्यक आहे.

**केशव घरत :-**

साहेब, प्रथम वृक्षप्राधिकरण समितीच्या अधिकाऱ्यांना या मिटींगला बोलावून घ्या.

**एस. ए. खान :-**

श्री. खतगावकर साहेब, तुम्ही टेम्पो परमनन्ट हटविले की, फक्त मिटींगसाठी हटविलेले आहेत ते सांगा.

**मा. सभापती :-**

आपण ज्या ठिकाणी टेम्पो हटविलेले आहेत. त्या ठिकाणी डिव्हायडरचे काम चालू आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापती महोदयांनी ३१ तारखेच्या बैठकीमध्ये टेम्पो हटविल्याबाबत चर्चा केल्याप्रमाणे खुलासा केलेला आहे.

**केशव घरत :-**

मा. सभापती साहेब, प्रथम वृक्षप्राधीकरण समितीच्या अधिकाऱ्यांना मिटींगला बोलवा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने खुलासा करतो की, या ठिकाणी जो बाजार लिलावाचा मुद्दा उपस्थित करण्यात आलेला होता. त्याच्यामध्ये असलेल्या ठेकेदारांना स्थायी समितीने दि. ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. प्रशासनाने दरम्यानच्या कालावधीमध्ये आवश्यक त्या निविदा मागविलेल्या होत्या. सदरच्या निविदा दि. २१ जुलैला ओपन केलेल्या होत्या. त्या निविदांची छाननी करुन, मुख्य लेखापरिक्षकाकडे तपासणी करुन पूर्ण केलेल्या आहेत व त्या सर्व निविदा स्थायी समितीसाठी रेफर केलेल्या आहेत. मा. आयुक्तांची मान्यता घेऊन येणाऱ्या सभेमध्ये त्या सर्व निविदा मंजुरीसाठी सादर केल्या जातील.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, तुम्ही त्या ठेकेदाराला काही कन्डीशन्स दिलेल्या आहेत का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्या स्थायी समितीसमोर त्या सर्व निविदा येतील.

**मोहन पाटील :-**

सध्या ठेकेदाराच्या कन्डीशन्सचा प्रश्न येत नाही. जेव्हा निविदा येतील. तेव्हा कन्डीशन्सचा प्रश्न येतो. परंतु, तुम्ही आता या निविदा का आल्या नाहीत, एवढेच विचारु शकता.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याकडून निविदाबाबतचे सर्व काम पूर्ण झालेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही आता सांगितले की, या निविदा जुन महिन्यामध्ये आलेल्या होत्या परंतु, आता जुलै महिना चालू आहे.

**गजानन भोईर :-**

आपण दि. ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण दि. ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

परंतु, टेंडर कधी काढले?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण दि. २१ जुलै रोजी टेन्डर ओपन केलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण दि. २१ जुलै रोजी टेन्डर ओपन केले आणि दि. ३१ जुलैपर्यंत टेंडरची लास्ट डेट आहे. मग आपली आज स्थायी समितीची सभा चालू असताना तुम्ही ह्या निविदेला उशीर का केला?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्या निविदेला उशीर झालेला नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जर दि. ३१ जुलै रोजी आपली मिटींग पुन्हा लागली नाही तर तुम्ही हे टेंन्डर ॲडॉप्ट करु शकता का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याला मान्यता होईल असे दर आलेले आहेत. त्यामुळे आपण टेंडर घेऊ शकतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपल्याला टेंन्डर ॲडॉप्ट करता येत असेल तर ॲडॉप्ट करा. अन्यथा, हा विषय पुढच्या स्थायी समितीमध्ये घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

आमचा ह्याच्यामध्ये कोणताही आक्षेप नाही. दि. २१ जुलै रोजी निविदा ओपन झालेल्या होत्या. आज या निविदा अंतिमरित्या स्थायी समितीकडे मंजूर करण्यासाठी मुख्य लेखापरिक्षकांनी शिफारस केलेली आहे. आज मा. आयुक्त साहेब मंत्रालयात असल्यामुळे काहीही होउ शकत नाही. परंतु, उद्या या सर्व निविदांवर सही होईल. मा. सभापती साहेब ३१ तारखेला शेवटची बैठक लावणार आहेत. आपण त्या वेळेला हा विषय मान्यतेसाठी ठेउ या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही हे लेट करित आहात. हे सर्व स्थायी समितीमध्ये मंजूरीला येणे आवश्यक आहे असे मला वाटते.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही निविदा मंजूरीचा विषय आजच्या समितीमध्ये घ्यायला पाहिजे होता.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही निविदा मंजूरीचा विषय ऑलरेडी स्थायी समितीमध्ये आणायला पाहिजे होता असे मला वाटते.

**प्रेमनाथ पाटील :-**

२१ तारखेला कमिशनर साहेबांनी सही करायला पाहिजे होती, असे माझे मत आहे.

**गजानन भोईर :-**

तुम्ही निविदा मंजूरीचा विषय एका महिन्यापूर्वी आणायला पाहिजे होता.

**सुर्यकांत भोईर :-**

बाजार लिलावाच्या ठेकेदाराला दि. ३१ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. त्यामुळे तुम्ही बाजार लिलावाचा विषय स्थायी समितीमध्ये आणायला पाहिजे होता.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, तुम्ही बाजार लिलावाचा विषय स्थायी समितीमध्ये आणायला पाहिजे होता. जर दि. ३१ जुलै रोजी मिटींग लागली नाही आणि त्यांची मुदत संपून गेली तर तुम्ही काय करणार आहात? ते सांगा.

**केशव घरत :-**

मा. उपायुक्तसाहेब, मी दि. १७/५/२००६ रोजी चिचबादेवी मंदिराजवळ बाके लावण्यासाठी एक पत्र दिलेले होते. मला गेल्या चार वर्षापासून अनुभव आहे. मला वृक्षप्रधिकरण समितीने दि. ११/७/२००६ रोजी उत्तर दिलेले आहे की, सदरचा विषय आमच्या अखत्यारित नसल्यामुळे आपण सार्वजनिक बांधकाम खात्याशी संपर्क साधावा. आम्ही या पत्राबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाला चौकशी केली असता सार्वजनिक बांधकाम खाते हा विषय त्यांच्या विभागाशी निगडित नसून वृक्षप्रधिकरण विभागाशी निगडित असल्याचे सांगते. मग आम्ही कोणाकडे जायचे? मला वृक्षप्रधिकरण समितीने असे उत्तर दिले आहे की, विषय - चिचबादेवी मंदिराजवळ बसण्यासाठी पाच बाके बसविण्याबाबत. याचा जावक क्रमांक २६९/६ आहे आणि हे दि. १७/०५/२००६ चे पत्र आहे. वरिल संदर्भिय पत्रान्वये विनंतीपूर्वक कळवितो की, वरिल संदर्भिय पत्रान्वये मागणी केलेली सदर बाब ही सार्वजनिक बांधकाम विभागाशी निगडीत असून संबंधित विभागाशी संपर्क करुन पत्रव्यवहार करावा ही विनंती आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

माझ्याकडेसुद्धा तसेच पत्र आहे.

**केशव घरत :-**

हे सार्वजनिक बांधकाम विभागाने पत्र दिलेले आहे की विषय - चिचबादेवी मंदिराजवळ पाच बाके बसविण्याबाबत. वरिल संदर्भिय विषयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील स्मशानभूमी उद्यानामध्ये बांधकामे अशी कामे वगळता झाडे लावणे, बाके बसविणे, खेळणी बसविणे ही कामे उद्यान विभागामार्फत करण्यात येतात. परंतु, उद्यान विभागाकडील तरतुद संपलेली असल्यामुळे जावक क्रमांक मनपा/उ./३१/ २००६-०७, दि. ११/०७/२००६ च्या पत्रान्वये श्री. केशव रामभाउ घरत, नगरसेवक यांना बाके बसवून देण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाशी निगडीत असून त्या विभागाशी संपर्क करुन पत्रव्यवहार करावा असे कळविलेले आहे. सदर संपूर्ण काम नगरसेवकांची दिशाभूल करणारे आहे. तरी आपण संबंधीतांवर कारवाई करावी हि विनंती.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

या ठिकाणी सन्मा. सदस्यांनी जो काही सदरचा विषय मांडलेला आहे. मी त्या अनूषंगांने खुलासा करु इच्छितो की, विषयांकित मंदिरासमोर नागरीकांसाठी आसन किंवा बाकांची व्यवस्था करावी, अशा आशयाची संबधित सदस्यांची मागणी होती. त्या अनुषंगाने जो परिसर आहे किंवा ज्या ठिकाणी बाके बसवायची आहेत. तेथील लँडची वस्तुस्थिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जज करुन ती बाके सिव्हिल पार्क म्हणून आम्ही रेफर केलेली होती. ती आपली सार्वजनिक जागा आहे. म्हणून आपल्याला तिकडे बाके बसवायला काहीही हरकत नाही. आपण येणाऱ्या कालावधीत बाके बसवू शकतो.

**केशव घरत :-**

साहेब, या ठिकाणी मंदिरांना बाके बसविण्याचा प्रश्न येत नाही. या ठिकाणी उत्तर दिलेले आहे ते बघा. दोन्ही विभिन्न उत्तरे आहेत.

**केशव घरत :-**

आम्ही गेल्या चार वर्षापासून वृक्ष प्राधिकरण समितीमध्ये आहोत. मग आम्हाला असे उत्तर का दिले जाते?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

तुम्हांला असे उत्तर सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेले आहे का?

**केशव घरत :-**

मला उत्तर दिलेले नाही मला हे पत्र मिळालेले आहे, मी त्या पत्रातील मजकुर वाचून दाखविलेला आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

कदाचित, हे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत व्हावे अशी उद्यान व वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्यांची भावना असू शकते. तो एक इंटरनल मॅटर आहे.

**केशव घरत :-**

आम्ही वृक्ष प्राधिकरण समितीकडे बाके बसविण्याबाबत मागणी केलेली आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

उद्यानामध्ये बाके वगैरे बसविण्याचे काम वृक्ष प्राधिकरण समितीच्या अधिकाऱ्याचे आहे.

**केशव घरत :-**

आम्हाला ज्यांनी पत्र दिलेले आहे त्यांच्यावर आम्ही तुम्हाला कारवाई करायला सांगितले तर तुम्ही त्यांच्यावर कारवाई करित नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

बाग-बगिचे वगैरे सर्वांची व्यवस्था वृक्षप्राधिकरण समितीमार्फत केली जाते. जेव्हा आपण टेंडर काढतो त्याच्यामधून बाग-बगिच्याची व्यवस्था आणि बाकांची व्यवस्थासुद्धा केली जाते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

तुम्हांला हे उत्तर सार्वजनिक बांधकाम विभागाने उत्तर दिलेले नाही.

**केशव घरत :-**

मला सार्वजनिक बांधकाम विभागाने उत्तर दिलेले नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

मग सार्वजनिक बांधकाम विभागाने उत्तर दिलेले नसतानासुद्धा या ठिकाणी चर्चा का होते?

**प्रेमनाथ पाटील :-**

परंतु, या पत्रावर श्री. केशव रामभाउ घरत असे नाव आहे.

**केशव घरत :-**

ह्या पत्रावर माझे नाव आहे.

**मोहन पाटील :-**

परंतु, प्रशासकिय कामकाजामध्ये कार्यालयीन पत्र बाहेर कशी जातात? याच्यावरुन प्रशासनाचे काम किती पारदर्शक आहे? ते दिसुन येते.

**केशव घरत :-**

साहेब, सार्वजनिक बांधकाम विभागाने असे उत्तर कसे दिले? आत्ता माझी दुसरी गोष्ट अशी आहे की, मी स्मशानभुमीमध्ये पाण्याची सोय करण्यासाठी एक पत्र दिलेले होते. तेव्हा वॉटर डिपार्टमेंटने सांगितले की, ते काम सार्वजनिक बांधकाम विभागाशी निगडीत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाला सांगितले तर ते सांगतात की, ते आमचे काम नाही, त्यांचे आहे, त्यांनी त्यांचे काम करावे. इथे नागरिकांना न्याय मिळत नाही. अशा प्रकारची उत्तरे आली तर आम्ही काय करावे? ते सांगा. तुम्ही नागरिकांना कशी उत्तरे द्याल? ते सांगा.

**मिलन पाटील :-**

प्रत्येक मिटींगला अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्यांना का बोलवावे लागते? अतिक्रमण विभागाचे अधिकारी का येत नाहीत?

**ध्रुवकिशोर पाटिल :-**

साहेब, मी तुम्हाला पुन्हा एकदा सांगतो की आपल्या क्षेत्रामध्ये इललिगल कन्स्ट्रक्शन चालू आहे. तुम्ही त्याबाबत काय कारवाई करणार आहात? ते सांगा. तुम्ही ए.टी.पी.ला अनधिकृत बांधकामाबाबतचा रिपोर्ट द्यायला सांगा. त्यांना अनधिकृत बांधकामाबाबत खुलासा करायला सांगा.

**केशव घरत :-**

ए.टी.पी.ने अनधिकृत बांधकामाबाबत खुलासा करावा, असे माझेसुद्धा मत आहे.

**मिलन पाटील :-**

तुम्ही ए.टी.पी.ला अनधिकृत बांधकामाच्या वाढीबाबत खुलासा करायला सांगा.

**मोहन पाटील :-**

मिरा भाईदर क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम होत आहे. आपण याच्यासाठी याचिका दाखल केली असता त्याच्यावर स्टे आलेला आहे. आपल्या क्षेत्रामध्ये जेवढी अनधिकृत बांधकामे आहेत त्या सगळ्याची यादी कोर्टात जमा करावी असे कोर्टाचे आदेश आहेत. मी प्रशासनाला अशी विनंती करतो की, मिरा भाईंदरमध्ये जेवढी अनधिकृत बांधकामे आहेत त्याची यादी जमा करावी. आपल्याला ती यादी जमा करता येईल का? कारण प्रशासन कुठेही अडचणीत येउ नये अशी या मागची भुमिका आहे. तुमच्याकडे अशा पद्धतीची यादी असेल किंवा तुम्ही अनधिकृत बांधकामाची यादी तयार केली असेल तर पुढच्या मिटींगला घेउन या. आपण त्याच्यावर चर्चा करु. आपल्याकडे जे गॅरेज आहे. त्याच्यावर हॉटेल बनविलेले आहे. आपले जे सेंट्रल हॉटेल आहे. त्या ठिकाणी जो गाळा होता. त्याच्यावरसुद्धा हॉटेल बनविलेले आहे. मिरा भाईंदरच्या रस्त्यावरसुद्धा अनधिकृत बांधकाम चालू आहे. आपल्या क्षेत्रामध्ये जे काही गाळे होते. त्या ठिकाणीसुद्धा अनधिकृत बांधकाम होत आहे. तुम्ही त्या पद्धतीने कुठे कुठे अनधिकृत बांधकाम चालू आहे याची माहिती घेउन या. आपण त्याच्यावर चर्चा करुया. आपण प्रत्येक वेळेला बोलतो परंतु, आपले कोणतेही पूर्ण होत नाही. आता दुसरी गोष्ट म्हणजे, तुम्ही रेल्वेमुळे बाधित झालेल्या जागेचासुद्धा विषय आणा. कारण आपल्याकडे हायकोर्टाने सर्व अनधिकृत बांधकामाबाबत माहिती मागितलेली आहे. आपल्याला त्या अनुषंगाने सर्व माहिती कोर्टाला देणे क्रमप्राप्त ठरणार आहे. दुसरी गोष्ट म्हणजे मिरा भाईंदर शहरामध्ये इललिगल बांधकामे वाढत आहेत. आपण त्यांचे सी.सी.चे पैसे पास केलेले आहेत. काही ठिकाणी चार पाच मजल्याची परमिशन घेऊन चार ऐवजी दहा करुन बिल्डिंग उभी केलेली आहे. तुम्ही याबाबत सविस्तर माहिती घेउन या. कारण उद्या हे प्रकरण कोर्टात गेल्यावर अधिकाऱ्यांची बदनामी होता कामा नये. तुम्ही त्या दृष्टीकोनातून विषय घेउन या आणि संबंधित विषयाची माहिती काढा.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण प्रत्येक मिटींगला अनधिकृत बांधकामाचा विषय आणतो. परंतु, आपले अधिकारी कुठल्याही प्रकारचे सहकार्य करित नाहीत.

**मोहन पाटील :-**

या ठिकाणी अनधिकृत बांधकामाबाबतचा विषय आणलेला आहे. आत्ता तुम्ही या विषयाच्या कार्यवाहीचा विचार करावा.

**सुर्यकांत भोईर :-**

आमच्या प्रभागात टर्निंगवर हॉटेल व्हायला आलेले आहे.

**रतन पाटील :-**

या विषयावर चर्चा करण्यासाठी विधी अधिकाऱ्यांना बोलवा. किती लोकांवर गुन्हे दाखल केलेले आहेत? किती लोकांनी स्टे आणलेले आहेत? त्याच्यासाठी कोणते वकिल नेमलेले आहेत या सगळ्याची माहिती होउ द्या.

**मोहन पाटील :-**

आपण विधी सल्लागारांना नंतर बोलवू या.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ५९ चे वाचन केले)

**सुर्यकांत भोईर :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, आपण दौऱ्याच्या विषयाबाबत काय निर्णय घेतलेला आहे? तो सांगा आणि ह्या प्रोसिडींगमध्ये तेवढे सोडून प्रोसिडींग मंजूर करा. कारण त्यावेळेला तेवढी चर्चा झालेली नव्हती. आपण दौऱ्याचा विषय रद्द करायचा की काय करायचे? ते सांगा.

(सन्मा. सदस्य श्री. एस्. ए. खान ह्यांनी प्रकरण क्र. ५९ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ५९ :-**

दि. २२/०५/२००६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ६१ :-**

दि. २२/०५/२००६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. एस. ए. खान.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ६० चे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब मला रस्त्याला नामकरण करण्याबाबत असे मत मांडायचे आहे की, प्लेझेंट पार्क माझ्या वॉर्डमध्ये आहे. मी या रस्त्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले मार्ग आणि छत्रपती शिवाजी महाराजावरील प्लेझेंट पार्कला सावित्रीबाई फुले चौक असे नाव देण्यीच प्रभाग अध्यक्षांना शिफारस करतो.

**दिपक खांबित :-**

तुम्हाला याच्यासाठी शिफारस करावी लागेल.

**सुर्यकांत भोईर :-**

मी शिफारसच करतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही बी. पी. रोडमधील भाजीमार्केटच्या रस्त्याला काय नाव दिलेले आहे? ते सांगा.

**रतन पाटील :-**

त्या रस्त्याला सुद्धा नांव दिलेले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही मिरा रोड चौकला नाव देण्याबाबत आम्ही विरोध करित नाही. आमचे कार्यकर्ते आहेत. मागच्या वेळेला हा विषय पेंडींग होता. मी त्याबाबत लेटर दिलेले होते. आमच्या कार्यकर्त्यांची संघटना आहे. त्या कार्यकर्त्यांनी ह्या चौकाला नाव द्यायचे ठरविलेले आहे.

**दिपक खांबित :-**

रस्त्याच्या नामकरणाबाबतचा विषय महासभेत शिफारस करण्यासाठी जाईल.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही तुमच्या मते रस्त्यांना नावे द्या. आम्ही काहीही ऑब्जेक्शन घेणार नाही.

**रतन पाटील :-**

दुसरा कुठे रोड असेल तर त्याला नाव द्या. आपण लोढा पार्कच्या एका रोडला हास्यकवी डॉ. श्यामसुंदर चौक असे नाव दिले तरी चालेल.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही डी. पी. रोडलासुद्धा नाव द्या. आम्ही त्याबाबत काहीही आक्षेप घेणार नाही.

**रतन पाटील :-**

गोल्डन नेस्टला जाणाऱ्या अंतर्गत रस्त्याला काय नाव दिलेले आहे?

**केशव घरत :-**

स्वामी आत्मानंद महाराज मार्ग हे कुठल्या रस्त्याला नाव दिलेले आहे? हा मार्ग मुळ कुठला आहे. मिरा रोडचा आहे की कुठला आहे? त्याबाबत माहिती असेल तर सांगा.

**जयंत पाटील :-**

स्वामी आत्मानंद महाराजांनी समाजाला काय शिकविलेले आहे? ते प्रथम सांगा. आपल्या देशात अनेक थोरवीर होउन गेलेले आहेत. त्यांनी देशाला योगदान दिलेले आहे. त्याचा विचार करा आणि नंतर रस्त्याला नांव द्या.

**केशव घरत :-**

आपल्याकडे स्वतंत्र्यसैनिक आहेत त्यांचे रस्त्यांना नाव द्या.

**गजानन भोईर :-**

आपल्याकडे स्वतंत्र्यसैनिक आहेत. त्यांचे रस्त्यांना नाव द्या. शिवाय तुम्ही गोपाळ दामोदर पाटील यांच्यासारखी नावेसुद्धा देउ शकता.

**प्रभात पाटील :-**

आपण रस्त्यांना जी काही नावे दिलेली होती त्याचा बोर्ड लावलेला नाही आणि जे काही बोर्ड लावलेले आहेत, त्याच्यावर कोणीतरी हँडबिल लावून ठेवलेले आहे. त्यामुळे तो बोर्ड कोणालाही वाचता येत नाही. तुम्ही त्याच्यासाठी लोखंडी फलक तयार करुन द्या.

**दिपक खांबित :-**

नया नगरला जाणाऱ्या त्या मधल्या रस्त्यालासुद्धा नाव द्यायचे बाकी आहे.

**मिलन पाटील :-**

लोढा पार्कच्या रोडला हास्यकवी डॉ. शामसुंदर शर्मा यांचे नांव द्या.

**मोहन पाटील :-**

सुभाषचंद्र बोस मैदानाकडून येताना जो रोड आहे. त्याचे राधास्वामी नाव आहे. त्याला वाल्मिकी चौक नाव देण्यात यावे.

**मा. सभापती :-**

गोल्डन नेस्टला जो चौक आहे त्या चौकाला स्व. राजीव गांधी चौक नाव देण्यात यावे.

**प्रेमनाथ पाटील :-**

भारतरत्न राजीव गांधी यांचे नांव एका रस्त्याला दिलेले आहे.

**केशव घरत :-**

त्यावेळेला आम्ही विरोध केलेला होता.

**मा. सभापती :-**

कुठल्यातरी एका रस्त्याला हास्यकवी ज्वालामुखीचे नाव देण्यात यावे.

**मिलन पाटील :-**

आम्ही हास्यकवी ज्वालामुखीच्या नावाने प्रस्ताव दिलेला होता.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही महात्मा ज्योतिबा फुले मार्ग आणि सावित्रीबाई फुले चौक नाव देणार आहात की नाही?

**दिपक खांबित :-**

आपला जांगिड ते प्लेझेंट पार्कचा जो रस्ता आहे. त्या रस्त्याला स्व. वसंतराव चव्हाण मार्ग असे नाव देण्याचे सुचविलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपला एम.टी.एन.एल.ला जो रस्ता जातो त्याला नाव दिले आहे का?

**दिपक खांबित :-**

त्या रस्त्याला नाव दिले आहे. परंतु, प्लेझेंट पार्कला जो रस्ता जातो त्याला नाव देणे बाकी आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपला जो एस.टी. स्टॉपचा नवीन डी.पी. रोड निघालेला आहे त्यालासूद्धा नाव द्या.

**मा. सभापती :-**

तुम्ही तो रस्ता तसाच ठेवलेला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण रस्त्याच्या नामकरणासाठी एवढे पैसे खर्च करतो. मग रस्त्याचे नामकरण होणे आवश्यक आहे.

**गजानन भोईर :-**

तुम्ही आमच्या प्रभागातील एका रस्त्याला गोपाळ दामोदर पाटील असे नाव द्या. कारण गोपाळ दामोदर पाटील हे नाव कुठेही नाही.

**प्रभात पाटील :-**

३१ तारखेला रस्त्याच्या नामकरणाची यादी फायनल करण्यात यावी असे माझे म्हणणे आहे.

**मोहन पाटील :-**

तुम्ही रस्त्याच्या नामकरणाचा विषय आत्ताच घ्या. कारण हा विषय महासभेत घेता येणार नाही. जर हा विषय महासभेत घेता येत असेल तर घ्या.

**दिपक खांबित :-**

आपण या विषयाबाबत नगरसचिवांना पत्र लिहूया.

**मोहन पाटील :-**

तुम्ही रस्त्याच्या नामकरणाची यादी तयार करा.

**सुर्यकांत भोईर :-**

मित्तल पार्कला जे नाव दिलेले होते ते तपासून त्या पार्कला स्व. वसंतराव चव्हाण असे नाव द्या.

**ध्रृवकिशोर पाटिल :-**

तुम्हाला रस्त्यांची नावे दिलेली होती. तुम्ही त्या त्या लोकांना तुम्ही जी नावे सुचवलेली आहेत ती सांगा.

**मोहन पाटील :-**

आपण चौक आणि रस्त्यांना नावे दिलेली आहेत. तुम्ही त्याची यादी पुढच्या मिटींगला घ्या आणि हा विषय पुढे घ्या. तुम्ही नामकरणाबाबतच्या सर्व रस्त्यांची यादी लिहून घ्या.

**केशव घरत :-**

माझ्या माहितीप्रमाणे आपण हटकेश रोडला नाव दिलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

छत्रपती शिवाजी महाराज मार्गाला असलेल्या प्लेझेंट पार्क चौकला स्व. राजेश पायलट नाव द्यावे.

**ध्रृवकिशोर पाटिल :-**

तुम्ही विषय पुढच्या मिटींगला घेउन या. मिरा रोडला कुठल्या कुठल्या रोडला नावे द्यायची आहेत ते बघुन विषय घेउन या.

**प्रभात पाटील :-**

जर तुम्ही पुढच्या मिटींगला रस्त्याच्या नामकरणाचा विषय आणत नसाल तर तुम्ही त्याची लिस्ट घ्या. आपल्याकडे बरेच रस्ते आहेत आणि त्या रस्त्यांना नावे देणे बाकी आहे. दुसरी गोष्ट म्हणजे आपली जी झाडे असतात. त्याच्यावर पोस्टर वैगरे चिकटवतात. तुम्ही त्याच्यापेक्षा बोर्ड बनवा आणि त्याच्यावर नाव लिहा. माझी स्पष्टपणे अशी सुचना आहे की नवघर रोड किंवा बी. पी. रोडला समांतर गाळ्यामधुन जो रस्ता जातो. त्या रोडला नाव देणे चुकीचे आहे. त्याला गाळा क्र. १ आणि गाळा क्र. २ असे नाव दिले तरी चालेल.

**मोहन पाटील :-**

तुम्ही या रोडला कार्यकर्त्यांचीसुद्धा नावे देउ शकता.

**प्रभात पाटील :-**

यासाठी तुम्हांला रस्ता नामकरणाची लिस्ट देणे आवश्यक आहे.

**मोहन पाटील :-**

तुम्ही रस्त्याच्या नामकरणाचा विषय पुढच्या मिटींगला घेउन या. मी याला सुचक राहतो आणि तुम्ही पुढच्या वेळेला ही विषय संपुर्णपणे घेउन या.

**जयंत पाटील :-**

गोडदेव स्मशान रोडला स्वातंत्र्यसैनिक गोविंद पाटील यांचे नाव दिलेले आहे. महानगरपालिकेकडून ही नावे कागदोपत्री येणे ही आपली जबाबदारी आहे. त्यामुळे तुम्ही या गोष्टीकडे लक्ष द्या.

**मा. सभापती :-**

आता हा विषय मंजूर झालेला आहे. तुम्ही दुसरा विषय घ्या.

**ध्रृवकिशोर पाटिल :-**

तुम्ही कोण कोणत्या रस्त्यांना नावे दिलेली आहेत? ते सांगा.

**दिपक खांबित :-**

आपण एकत्र बसुन ठराव करुया आणि रस्ता नामकरणाचा विषय पुढच्या मिटींगला घेउया.

**प्रकरण क्र. ६० :-**

रस्त्यांच्या नामकरणाबाबत शिफारस करणे.

**ठराव क्र. ६२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील खालील रस्त्यांच्या व चौकांच्या नामकरणाची शिफारस महासभेपुढे करण्यात येत आहे.

| अ.क्र. | ठिकाण | प्रस्तावित नाव |
|---|---|---|
| १ | प्लीझंट पार्क रस्ता | महात्मा ज्योतिबा फुले मार्ग |
| २ | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर प्लीझंट पार्क चौक | सावित्रीबाई फुले चौक |
| ३ | लोढा पार्क (रेल्वे बॉम्बस्फोट झालेला चौक) | हास्यकवी डॉ. श्यामसुंदर शर्मा चौक |
| ४ | प्लीझंट पार्क ते जांगीड (हेतलपार्क) | स्व. वसंतराव चव्हाण मार्ग |
| ५ | सृष्टी पोलिस चौकी समोरील चौक | स्वामी विवेकानंदजी महाराज चौक |
| ६ | एस.के. स्टोन ते एम.आयजी कॉम्प्लेक्स रस्ता | महात्मा गांधी मार्ग |
| ७ | भाईंदर (पुर्व) उड्डाणपूल लगत सर्व्हीस रोड | स्व. राजेश पायलट मार्ग |
| ८ | सुभाषचंद्र बोस मैदान समोरील चौक (उत्तन रोड) | वाल्मिकी चौक |
| ९ | आझादनगर गल्ली नं. २ | अमर शहीद भगतसिंग मार्ग |
| १० | आझादनगर गल्ली नं. ३ | अमर मौलाना अबूल कलाम आझाद मार्ग |

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. एस. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ६१ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील ह्यांनी प्रकरण क्र. ६१ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**एस. ए. खान :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**केशव घरत :-**

आपण या लोकांना सहा महिन्याची मुदतवाढ देउ या. परंतु, प्रथम त्यांची काय प्रगती आहे? ती सांगा. तुम्ही याबाबत माहिती मिळवण्यासाठी संबंधीत खात्याच्या लोकांना बोलावुन घ्या. आपण आपत्कालीन परिस्थितीवर नियंत्रण करण्यासाठी स्टाफ नेमून दिलेला आहे. त्याच्यामध्ये आपल्या पालिकेचे जे.सी.बी. आणि पोकलन आहेत का? याची जरा माहिती द्या.

**जयंत पाटील :-**

श्री. देवेंद्र नामदेव तेरसे बोलल्याप्रमाणे आपल्याला ऑटोमोबाईल इंजिनियरची आवश्यकता आहे. आपण मागच्या वेळेला टिपणीमध्ये तसे मेन्शन केलेले होते. आपण तात्पुरत्या स्वरुपात असा इंजिनियर ठेवु या. मागच्या स्थायी समितीमध्ये हा विषय आलेला होता. शिवाय ह्या देशात ऑटोमोबाईल इंजिनियर कमी झालेले आहेत. मुले ऑटोमोबाईल इंजिनियरचे शिक्षण घेत नाहीत. आपल्या क्षेत्रातील मुलांनी ऑटोमोबाईल इंजिनीयरचे शिक्षण घ्यायला पाहिजे. परंतु, आपण त्याच्यासाठी मॅकेनिकल इंजिनियरची निवड करु या. माझा त्याला काहीही विरोध नाही.

**मा. सभापती :-**

हे इंजिनियर साधे गाडीचे पार्ट सांगू शकत नाहीत. त्यामुळे आपण या इंजिनियरना सहा महिन्याची मुदतवाढ देऊ या.

**जयंत पाटील :-**

तुम्ही हा विषय महासभेमध्ये घ्या असे मी बोललो होतो.

**गजानन भोईर :-**

आपण आपल्या पालिकेचा विश्वासघात करित आहोत असे मला वाटते.

**केशव घरत :-**

आपल्याकडे जे.सी.बी. आणि पोकलन आहेत. त्याच्यामध्ये दोन जे.सी.बी. आहेत.

**प्रकरण क्र. ६१ :-**

कनिष्ठ अभियंता (वाहन) ठेका पद्धतीने घेणेबाबत.

**ठराव क्र. ६३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वाहन विभागात तांत्रिक कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्याने वाहन विभागासाठी तांत्रिक ज्ञान आवश्यक असलेला कर्मचारी नाही. त्यामुळे वाहन विभागांतर्गत देखभाल, दुरुस्ती करणेची फार गैरसोय होते म्हणून तात्पुरत्या स्वरुपात सदर पद भरण्याकरिता महानगरपालिकेकडून दै. गावकरी व साप्ता. सुरजप्रकाश या वृत्तपत्रात दि. १४/०७/२००६ रोजी सुचना प्रसिद्ध करण्यांत आलेली होती. सदर सुचनेनुसार मुदतीत खालील उमेदवारांनी अर्ज सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | शैक्षणिक पात्रता | अपेक्षित मानधन |
|---|---|---|---|
| १ | श्री. देवेंद्र किरण पाटील | बी.ई. (मेकेनिकल) | रु. १८०००/- प्रति महिना |
| २ | श्री. नितीन नामदेव तेरसे | बी.ई. (मेकेनिकल) | रु. १०५००/- प्रति महिना |
| ३ | श्री. तुषार अरविंद राऊत | डी.पी.टी. (प्रोडक्शन) | रु. १५०००/- प्रति महिना |

वरील उमेदवारापैकी श्री. नितिन नामदेव तेरसे यांची शैक्षणिक पात्रता बी.ई. (मेकेनिकल) असून अपेक्षित रु. १०५००/- प्रति महिना या मानधनावर अन्य उमेदवारांचे अपेक्षित मानधनापेक्षा त्याची मागणी कमी आहे. तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) अंतर्गत तरतुदीनुसार श्री. नितिन नामदेव तेरसे यांना कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) म्हणून कंत्राटी पद्धतीने सहा महिन्याकरिता करार करुन नेमण्यास मंजूरी देण्यांत येत असून आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. मिलन पाटील.** **अनुमोदन :- श्री. एस. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ६२ चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

या ठिकाणी प्रकरण क्र. ६२ चा गोषवारा दिलेला नाही.

**केशव पाटील :-**

तुम्ही या ठिकाणी संक्रमण शिबिराच्या विषयाबाबत गोषवारा देऊन उल्लेख करायला पाहिजे होता.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण विषयप्रत्रिकेमध्ये प्रकरण क्र. ६२ म्हणून विषय आणलेला आहे.

**केशव घरत :-**

अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकामा विषयीची माहिती ३१ तारखेच्या मिटींगला मिळेल का?

**प्रेमनाथ पाटील :-**

अतिक्रमण विभागाचे श्री. तायशेट्टे साहेब आलेले आहेत का?

**रतन पाटील :-**

प्रकरण क्र. ६२ शी संबंधित अधिकारी कुठे आहेत?

**सुर्यकांत भोईर :-**

श्री. दिलीप घेवारे साहेब कुठे आहेत?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

श्री. दिलीप घेवारे साहेब मिटींगला गेलेले आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

श्री. घेवारे साहेबांना आज मिटींग लागलेली आहे हे माहिती नाही का? आम्हाला आता ज्या उत्तराची अपेक्षा आहे ते उत्तर द्यायला श्री. घेवारे साहेब उपस्थित असणे आवश्यक आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महासभेचा सर्व परवानग्या रद्द करण्याचा विषय आहे. त्याच्यामुळे तुम्ही सर्व परवानग्या रद्द करा आणि हा विषय महासभेत घ्या.

**रतन पाटील :-**

परंतु, संक्रमण शिबिराचा विषय स्थायी समितीमध्ये आणलेला होता.

**प्रेमनाथ पाटील :-**

संक्रमण शिबिराचा विषय महासभेत आणलेला नव्हता.

**सुर्यकांत भोईर :-**

संक्रमण शिबिराबाबत उत्तर देतो असे तुम्ही बोलले होते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही संक्रमण शिबिराचा विषय घेतला. परंतु तुम्हाला या विषयाची माहिती आहे का? आणि तुम्ही आवश्यक परवानग्यांबाबत मंजूरी विचारता हे योग्य आहे का?

**मोहन पाटील :-**

आपल्या क्षेत्रामध्ये ६० टक्केपेक्षा जास्त रिझर्वेशन सी.आर.झेड.ने बाधित आहे. आपण ही सर्व अपेक्षित रिझर्व्हेशन शाळेला दिलेली होती. आपल्या शहराची लोकवस्ती वाढण्याच्या दृष्टीने शाळा, गार्डन होणे आवश्यक आहे. आपण त्या पद्धतीने बेघरांना घरे देण्याचे रिझर्व्हेशन केलेले होते. ते रिझर्व्हेशन सी.आर.झेड. मध्ये बाधित झालेले आहे. आपण जागा दिली तेव्हा सी.आर.झेड.चा प्रश्न नव्हता. एकदा जागा सी.आर.झेड. खाली बाधित झाल्यानंतर अपेक्षित जागेचा खर्च पूर्ण होऊ शकत नाही. आपण महासभेत या विषयावर चर्चा केलेली होती. मग धोरण निश्चित करण्याची परवानगी कशी दिली? याचे मला उत्तर द्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही संक्रमण शिबिराची परवानगी कोणाला विचारुन दिलेली होती, ते सांगा. तुम्ही ही परवानगी महासभेला विचारुन दिली का?

**मोहन पाटील :-**

संपूर्ण एरियामध्ये एकूण ५ हजार फ्लॅट भरत असतील. परंतु, आपल्या सी.आर.झेड. मध्ये जेवढी जागा बाधित झालेली आहे, त्याच्यामधून २ हजार फ्लॅट मिळालेले आहेत. परंतु, ३ हजार लोकांना फ्लॅट मिळत नाहीत. आपण असा विषय महासभेला आणलेला होता. आपल्याला जो काही निर्णय घ्यायचा होता तो महासभेला घ्यायला पाहिजे होता. आपण तसे विचारुन परवानगी दिलेली आहे का? ते सांगा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने खुलासा करतो की, आपल्याकडे जागा १०० टक्के सी.आर.झेड. बाधित आहे. त्यामुळे आपल्याला ३० टक्के २२२(अ) मध्ये आणि १०० टक्के जागा २२२ मध्ये हाउसिंग फॉर डिस-हाउसिंगसाठी फ्री आहे व सध्या अनुज्ञेय आहे. आपल्याला आतापर्यंत प्लॅनिंग ॲथोरिटीमध्ये सहा परवानग्या दिलेल्या आहेत. त्यापैकी जे दिलेले क्षेत्र आहे ते १६,२३४.४२ चौ.मी. आहे. त्या बदल्यात जे डी.सी. रूल मंजूर आहेत. त्याच्यामध्ये १० टक्के जागा ॲकोमडेशन डेव्हलपमेंट करिता घ्यायची आहे. त्यांच्याकडून १६.७५ चौ.मी. इतर एरियामध्ये सदनिका मिळतात ही वस्तुस्थिती आहे. आपण ह्या सेक्टरपैकी सर्वसाधारणपणे १६,२३५ ला परवानगी दिलेली आहे. आपल्याला जवळपास खूप मोठ्या प्रमाणात हे फ्लॅट उपलब्ध होणार आहेत. आपल्याला हाऊसिंग फॉर डिस-हाउसिंग म्हणजेच संक्रमण शिबिर बांधायचे असतील तर आपण उर्वरित जागेपैकी लॅन्ड निगोसियेशन किंवा ॲक्विझीशन करून ती लॅन्ड उपलब्ध करुन घेऊ. आपल्याला हा विषय महापालिकेच्या निधीतून कायमस्वरुपी संक्रमण शिबिर काढण्यासाठी घ्यायचा आहे.

**मोहन पाटील :-**

माझा मुद्दासुद्धा तसाच आहे. जर जागा आपल्या ताब्यात असेल आणि ती जागा सी.आर.झेड. बाधित नसेल किंवा ती जागा सॉल्ट डिपार्टमेंटची नसेल व ती जागा ॲक्विझीशन करण्याची पॉवर आपल्याकडे असेल तर आपण ती जागा ॲक्विझीशन करुन संपूर्ण परमिशन घेऊन त्या सदनिका आपल्याकडे घेऊ शकातो. जर आपण आवश्यकता बघितली किंवा या मिरा भाईंदरमधील धोकादायक इमारतींचा विचार केला तर आपल्याला चार हजार सदनिकांची आवश्यकता आहे. असे असताना जर आपण या सदनिका बांधलेल्या आहेत. तर आपली महापालिका त्याच्यासाठी तेवढी सक्षम आहे असा त्याचा अर्थ होतो. आपण विकासकाला ही परवानगी रद्द करुन ज्या विकासकाने सदनिका बांधलेल्या आहेत. त्या सर्व सदनिका ताब्यात घ्या. आज आपल्याला नवघर रोडला आराधना बिल्डिंगमध्ये १२५ सदनिका पाहिजेत. परंतु, आपल्याकडे काहीही नाही. जर आराधना बिल्डिंग दिवसा कोसळली असती तर जीवितहानी झाली असती आणि आपल्याला प्रॉब्लेम निर्माण झाला असता. परंतु, ती बिल्डिंग रात्री कोसळली आहे. म्हणून तुम्हाला सांगतो की, ज्या सदनिका आपल्या अखत्यारित नाहीत. आपण त्या आपल्या अखत्यारित करु शकतो. आपण यासाठी प्रशासनाकडून निधी उपलब्ध करुन घेऊ शकतो. आपल्याकडे याच्यासाठी सोर्सेस उपलब्ध आहेत. आपल्याकडे याच्यासाठी एम.एम.आर.डी.ए. व शासनाकडून सोर्स उपलब्ध होऊ शकातो. आपण ती व्यवस्था करून ज्या सदनिका शासनाने बांधलेल्या आहेत त्या ताब्यात घ्या. त्याची परवानगी कॅन्सल करा. कारण आपल्याला त्या सदनिकांची आवश्यकता आहे.

**गजानन भोईर :-**

आपल्याला या ९७ सदनिका एका डेव्हलपर्सकडून प्राप्त होणार आहेत की तीन-चार डेव्हलपर्सकडून प्राप्त होणार आहेत ते सांगा.

**जयंत पाटील :-**

आपण हाऊसिंग फॉर डिस-हाऊसिंग करित आहोत. परंतु, हे संक्रमण शिबिर नाही. आपल्याकडे जे बांधकाम चालू आहे ते हाऊसिंग फॉर डिस-हाऊसिंगचे आहे. तुम्ही हे काम मुळात कोणाला देणार आहात? ते सांगा. तुम्ही बिल्डिंग पडलेल्या लोकांना या सदनिका देऊ शकत नाही. तुम्ही हाऊ सिंग फॉर डिस-हाऊ सिंगचा रुल वाचला का? मी तुम्हाला हाऊसिंग फॉर डिस-हाऊसिंगचा रुल दाखवतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

हाऊसिंग फॉर डिस-हाऊसिंग म्हणजे बेघरांना घरे उपलब्ध करुन देणे असा त्याचा अर्थ आहे.

**जयंत पाटील :-**

आपल्याकडे ज्या जागा रस्त्यामध्ये बाधित होतात त्यांना घरे उपलब्ध करुन द्यायची आहेत.

**दिपक खांबीत :-**

रस्त्यासाठी ज्या जागा बाधित होतात. त्यांच्यासाठी घरांची व्यवस्था आहे.

(सन्मा. सदस्य श्री. जयंत पाटील ह्यांनी सभागृहासमोर रुलचे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

रस्ता रुंदीकरणासाठी ज्या जागा बाधित होतात त्यांना घरे उपलब्ध करायची आहेत.

**जयंत पाटील :-**

आपल्याकडे म्युनिसिपाल्टीच्या प्लॅनमुळे जी लोक अफेक्टेड होतील. त्यांना घरे द्यायची आहेत. परंतु, संक्रमण शिबिर ह्याच्यामध्ये मोडत नाही. तुमच्या डी.सी. रुलमध्ये संक्रमण शिबिरसाठी जागा नाही. तुम्ही रिझर्व प्लॉटमध्ये कुठे जागा आहे? ते दाखवा. तुम्हाला ते ३७ खाली आणावे लागेल. तुम्हाला ते आणून पुन्हा शासनाकडे पाठवून ॲक्वायर करून संक्रमण शिबिर बनवावे लागेल आणि हे सर्व काही लवकरात लवकर होणे आवश्यक आहे. परंतु, तुम्ही हाऊसिंग फॉर डिस-हाऊसिंगमध्ये करु शकत नाही.

**केशव घरत :-**

तुम्ही कुठल्या बेसवर परवानगी दिलेली आहे? ते सांगा.

**जयंत पाटील :-**

आपण जी काही उपाययोजना करतो. ती हाऊ सिंग फॉर डिस-हाउसिंगसाठी आहे. ती संक्रमण शिबिरासाठी नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही संक्रमण शिबिरचा विषय महासभेत आणायला पाहिजे होता.

**जयंत पाटील :-**

अजूनपर्यंत त्याचे नियम ठरलेले नाहीत.

**दिपक खांबीत :-**

आपल्याकडे जी जागा उपलब्ध आहे. आपण त्या ठिकाणी तोपर्यंत संक्रमण शिबिर करुया. नाहीतर आपल्याला संक्रमण शिबिर करायचे आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

ती जागा आपल्या ताब्यात आहे का?

**दिपक खांबीत :-**

आपण या जागेवर तात्पुरत्या स्वरुपात संक्रमण शिबिर बांधु शकतो.

**जयंत पाटील :-**

जर तुम्ही तात्पुरत्या स्वरुपात संक्रमण शिबिर बांधणार असाल तर त्यासाठी रिझर्व्हेशन बदलायला लागेल. आपल्याकडे शाळेचे किंवा इतर कुठलेही रिझर्व्हेशन असते आणि तात्पुरते म्हणजे काय? तुम्ही लाखो-करोडो रुपयांचा खर्च तात्पुरता संक्रमण शिबिरासाठी करणार आहात का?

**दिपक खांबीत :-**

आपल्याकडे शाळेचे रिझर्व्हेशन आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही जो काही खर्च करणार तो तात्पुरता होणार नाही. तुम्हाला संक्रमण शिबिर तिथूनच करावे लागेल आणि खर्च करणे गरजेचे आहे.

**दिपक खांबीत :-**

आपण त्या लोकांना तंबू देऊया.

**जयंत पाटील :-**

फ्लॅटमध्ये राहणारे लोक तंबूत राहतील का? याचा जरा विचार करा.

**दिपक खांबीत :-**

परंतु, आपण त्या लोकांची व्यवस्था करणार आहोत.

**जयंत पाटील :-**

ती लोक तंबूत कसे राहतील?

**मोहन पाटील :-**

सध्या श्री. घेवारे साहेब उपस्थित नसल्यामुळे हा विषय पुढच्या मिटींगला घेऊया.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही पुढच्या वेळेला या विषयासंबंधी समितीला संपूर्ण माहिती द्या.

**मोहन पाटील :-**

आपण या विषयाची माहिती पुढच्या मिटींगला घेऊ या.

**गजानन भोईर :-**

आपण या ९७ सदनिका प्रकल्पग्रस्तांना देऊ शकतो. दुसऱ्या कोणालाही देऊ शकत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण एकूण ४९९ सदनिका पैकी फक्त ९७ सदनिका बांधत आहोत.

**सुर्यकांत भोईर :-**

या सदनिका बांधायला कोणी परवानगी दिली ते सांगा. माझ्या माहितीप्रमाणे सन २००५ मध्ये सदनिका बांधायला परवानगी दिलेली आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापतीसाहेबांच्या परवानगीने मी या ठिकाणी खुलासा करतो की, संक्रमण शिबिरामध्ये तात्पुरती व्यवस्था असते. तिथे टायटल ऑफ पझेशन काहीही नसते. आपली अशी धारणा आहे की जे आपद्ग्रस्त होतील त्या कायमस्वरुपी व्यवस्था करु.

**रतन पाटील :-**

ही कायमस्वरुपी व्यवस्था नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

विकास करण्यामध्ये जी काही घरे बाधित होतील किंवा ज्या काही इतर अडचणी येतील त्याच्यासाठी या सदनिका आहेत हे फॅक्ट आहे. ह्याचा अर्थ असा आहे की, ९७ सदनिका असतांनासुद्धा जर मोठे काही एमर्जन्सी झाले आणि ५० फॅमिलीला इश्यू झाला तर आपण काहीही करुन या सदनिकांचा उपयोग करून घेऊ शकतो असे मला म्हणायचे होते. संक्रमण शिबिरला परमंन्ट पझेशन अपेक्षित नाही. एखादी कॅलोमिनिटी झाली आणि शहरामध्ये इश्यू झाला आणि लोक बेघर झाले तर त्यांचा दैनंदिन व्यवहार तात्काळ उत्पन्न करता. आपण त्यांना रिॲबिलिटी करुन त्यांची सोय करु या. ह्याच्यासाठी संक्रमण शिबिर अपेक्षित आहे. आपण म्हटल्याप्रमाणे ह्याच्यामध्ये संक्रमण शिबिरसाठी पर्टिक्युलर रिझर्व्हेशन नाही. हाउसिंग फॉर डिस-हाउसिंग म्हणजे बेघरांसाठी घरे असा त्याचा अर्थ होतो. जर शहरामध्ये जो काही मोठा प्लॉट आहे. त्यापैकी काही भाग ह्या प्रोजेक्टसाठी ३-४ हेक्टर जागा उपलब्ध केली तर आपल्याला कायमस्वरुपी चांगली शेड, टॉयलेट, बाथरुम भविष्यात कुठेही वापरता येईल. उद्या शहरात मोठे काही झाले तर माझा असा हेतू होता की ह्याचे रिझर्व्हेशन करुन कार्यवाही करण्यापेक्षा तो काही भाग यासाठी वापरु शकतो. शिवाय, साडे-पाच ते साडे सहा हेक्टर जागा सी.आर.झेड. बाधित नाही आणि ती अजूनही शिल्लक आहे.

**जयंत पाटील :-**

मग तुम्ही त्यांचे रिझर्व्हेशन बदला तुम्ही त्यांना कुठल्या व्यवस्थेने राहायला देणार ते सांगा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण त्या लोकांना तात्पुरत्या स्वरुपात रहायला देणार आहोत.

**जयंत पाटील :-**

महापालिकेने याबाबत धोरण ठरविलेले नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

महापालिकेचा संक्रमण शिबिराबाबत धोरण ठरवावे लागेल.

**जयंत पाटील :-**

तुम्हाला ते धोरण महासभेपुढे आणावे लागेल.

**सुर्यंकांत भोईर :-**

तुम्ही ते धोरण महासभेपुढे आणा.

**गजानन भोईर :-**

मागच्या वेळेला, ११९ लोक आलेले होते. त्यांनी सांगितले की, तंबु बांधा. परंतु, त्या तंबुमध्ये दोन तीन दिवससुद्धा राहू शकत नाही अशी परिस्थिती आहे.

**जयंत पाटील :-**

त्या तंबूमध्ये रहायला होऊ शकत नाही.

**गजानन भोईर :-**

ही लोक तंबूमध्ये कशी राहणार? कारण त्या तंबूमध्ये संडास, बाथरुम नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. खतगावकर साहेब, तुम्ही आता सांगितले की, जे उरलेले आरक्षण आहे ते डेव्हलप करुया.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

जर तुमच्या सर्वांचे एकमत असेल तर आवश्यकता पडेल तेव्हा आपण व्यवस्था करू शकतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जी जमिन खाजगी मालकीची असेल तर तुम्ही त्या एका जमिन मालकाला जमिन डेव्हलप करा असे सांगता. तुम्ही बांधा व विका आणि त्यांचे काही परसेंन्ट दया असे सांगता. तुम्ही दुस-या जमिन मालकाला सांगता की, तुम्ही जमीन ॲक्वायर करा. असे केले तर तो माणुस खोटा पडेल. तुम्ही एकाला सांगता संक्रमण शिबीर बांधा आणि रतन डेव्हलपरला तुम्ही आम्हाला जमिन दया असे सांगता.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी मागच्या बैठकीत या विषयावर खुलासा केलेला होता. आपले कार्यालयात डि.सी रुल्स आहेत. त्याच्यामध्ये जी तरतुद आहे. शिवाय प्लॅनिंग ॲथोरिटी व ॲकोमडेशन डेव्हल्पमेन्टसाठी दहा टक्के घेण्याबाबत महासभेने व शासनाने मान्यता दिलेली आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

सन १९९७ रोजी परमिशन दिलेली आहे.

**रतन पाटील :-**

संक्रमण शिबिर बांधण्याबाबत एका साईडने परवानगी दिलेली आहे. दुस-या साईडने परवानगी दिलेली नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्या संचिकेमध्ये सहा परवानगीमध्ये निर्णय आलेला आहे. आम्ही त्या संचिका बघितलेल्या आहेत. आपण धोरणात्मक निर्णय घेउन स्थायी समितीची परवानगी घेऊ शकतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही संक्रमण शिबिरचे प्रथम चूज करा कारण ऑल आर इक्वल.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मॅन्युअल ॲथोरिटी म्हणून निर्णय झालेला हा पहिला निर्णय आहे.

**मोहन पाटील :-**

आपण आपला निर्णय मागे घेऊ शकतो. आपल्याला आपली परवानगी कॅन्सल करुन फ्लॅट ताब्यात घ्यायचे आहेत.

**रतन पाटील :-**

आपल्या दहा सदनिका आहेत मग परसेन्टेज वाढवा.

**मोहन पाटील :-**

संबंधित विषयाचे अधिकारी आले की आपण या विषयावर चर्चा करुया.

**सुर्यकांत भोईर :-**

गेल्या वेळेला माहितीसहित सभागृहात हजर राहू असे संबंधित अधिकारी बोलले होते.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

संबंधित अधिकारी मंत्रालयात सी.आर.झेड. बाबत मिटींग असल्यामुळे मिटींगला हजर राहू शकलेले नाहीत. परंतु, त्यांनी मा. सभापती साहेबांना तशी कल्पना दिलेली आहे. मा. सभापती साहेबांच्या परवानगीने मंत्रालयात गेलेले आहेत.

**प्रभात पाटील :-**

मला या ठिकाणी एक प्रश्न विचारायचा आहे की, आपण त्यांना परमिशन देताना त्यांना त्या जागा दिलेल्या आहेत का? की, त्या माणसाने विकत घेतलेल्या आहेत?

**जयंत पाटील :-**

ती जागा आरक्षित आहे. त्यांनी ती जागा विकत घेतलेली आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ते आरक्षण डेव्हलपमेन्ट प्लॅनमध्ये होते. ती लॅंन्ड ट्रान्सफरेबल आहे. जर आरक्षण असेल तर त्याची मालकी ज्यांनी कोणी शेअर केली असेल त्याला ती बदलत असते. त्याचा वापर आरक्षणाप्रमाणे मला पाहिजे आणि त्याप्रमाणे ते झालेले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

त्या आरक्षणामध्ये शॉपिंग काढू शकतो का? त्यांनी ती बिल्डींग बनवलेली आहे. परंतु, परवानग्या दिलेल्या आहेत. तिथे तो टॉवर बांधतो आणि खाली दुकानाचे गाळे टाकलेले आहेत. तुम्ही गाळ्यांना दुकानाची परवानगी दिलेली आहे का? जर तुम्ही दुकानाच्या गाळ्यांना परवानग्या दिलेल्या असतील तर कुठल्या बेसवर परवानग्या दिलेल्या आहेत? ते सांगा.

**नरेंद्र चव्हाण :-**

आपण संबंधित जागांना कमर्शियल परवानग्या दिलेल्या आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण कमर्शियल परवानग्या देऊ शकत नाही. तुम्ही डिस-हाऊसिंगला कमर्शियल परवानगी कशी दिली?

**मा. सभापती :-**

श्री. घेवारे साहेब उपस्थित नसल्यामुळे हा विषय पुढच्या मिटींगला घेण्यांत यावा.

**मिलन पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपल्याला ७५ हेक्टर जागा उत्तनला प्रकल्पासाठी दिलेली आहे. आपल्याला त्याच्यामध्ये जागा बाधित होत नाही. आपण त्याच्यामध्ये संक्रमण शिबिर बांधले तर चालेल का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्या जागेचे सर्टीफिकेशन होऊन ती जागा निश्चित केलेली आहे. आता त्याच्यामध्ये बदल करता येत नाही.

**प्रकरण क्र. ६२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील नागरीकांसाठी आपत्कालिन परिस्थितीत तात्पूरत्या स्वरूपात राहण्या करिता संक्रमण शिबीराची व्यवस्था करणेबाबत.

**ठराव क्र. ६४ :-**

मा. सभापती सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा ठराव पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ६३ चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

आपल्याकडे किती वकील आहेत? मिरा भाईंदर महागनरपालिकेचे कामकाज किती वकील बघतात? कुठल्या कोर्टात कामे पेन्डिग आहेत? किती वकील महापालिकेचे काम बघतात?

**सई वडके (मा. विधी अधिकारी) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलते की, आपल्या महापालिकेच्यावतीने १७ पॅनेलवर अभियोक्ते आहेत.

**रतन पाटील :-**

कुठल्या-कुठल्या कोर्टात केसेस प्रलंबित आहेत? त्याची माहिती द्या.

**सई वडके (मा. विधी अधिकारी) :-**

ठाणे कोर्टात एकून ६० केसेस प्रलंबित आहेत. मी वकीलांची नांवे सांगते. ॲड. श्रीम. अनुराधा आपटे, ॲड. श्रीम. अस्मिता सारंगधर, ॲड. श्री. विजय साळी, ॲड. श्री. कांबळे, ॲड. श्री. बनसोडे, ॲड. श्री. रामचंद्र आपटे हे हायकोर्टात आहेत. ॲड. श्री. सुभाष हे हायकोर्टात आहेत. ॲड. हर्षद भगवते हे हायकोर्टात आहेत. ॲड. श्री. चोप्रा, ॲड. श्री. अग्रवाल, ॲड. श्री. जाली सादगी हे औद्योगिक कोर्टात आहेत.

**मिलन पाटील :-**

ॲड. श्री. सुहास ओक, हायकोर्टात आहेत का?

**सई वडके (मा. विधी अधिकारी) :-**

ॲड. श्री. सुहास ओक हायकोर्टात आहेत आणि ते गेल्यावर्षी आलेले आहेत.

**रतन पाटील :-**

आपले १७ वकील आहेत आणि ते वकील महापालिकेच्या विविध कोर्टात काम बघतात. ते वकील किती केसेस हाताळत आहेत किंवा त्यांनी आतापर्यंत महापालिकेने केसेस जिंकलेल्या आहेत आणि किती केसेस हरलेले आहेत ते सुध्दा सांगा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने खुलासा करतो की, विधी अधिकारी यांना नव्याने अप्वॉईन्ट केलेले आहे. त्यांनी मागच्या महिन्यात पदभार स्विाकरलेला आहे. त्या अनुषंगाने त्यांनी सर्व अभियंत्यांच्या पर्सनली बैठका घेतलेल्या आहेत. सर्व विभागाची अभिलेखे काढून सर्व रेकॉर्ड अद्ययावत केलेले आहेत. या ठिकाणी असा मुद्दा उपस्थित झाला की, आपली किती प्रकरणे अंतिम झालेली आहेत? किती प्रकरणे प्रलंबित आहेत हे तुम्ही सविस्तर बघा आणि पुढच्या सभेला ह्या विषयाच्या गोषवाऱ्यासहित हा विषय घेऊ या. म्हणजे अतिक्रमण विभाग, सामान्य प्रशासन विभाग वगैरेकडे किती प्रकरणे प्रलंबित आहेत? किती प्रकरणात निर्णय झालेला आहे? किंवा जेवढी प्रलंबित प्रकरणे आहेत? त्यांची संख्या किती आहे? याची माहिती घेऊन या.

**जयंत पाटील :-**

आपल्या विरोधात निर्णय झालेला आहे.

**रतन पाटील :-**

महापालिकेच्या विरोधात निर्णय झालेला आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण वकीलांना पैसे देतो. परंतु, ते वकील एकही केस जिंकुन देत नाहीत. आपली महापालिका तोट्यात चाललेली आहे. तुम्ही त्याबाबत काय कार्यवाही करणार आहात? ते सांगा.

**रतन पाटील :-**

आपण महापालिकेच्या केसेस लढविण्यासाठी रु. १५ लाख खर्च करतो त्याचे काय?

**सुर्यकांत भोईर :-**

आपले वकील कोर्टात हजर नसतात.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही त्या वकीलांना थोडा अवधी द्यायला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

आपल्याला त्या वकीलांकडून थोडी माहिती मिळेल असे किती वकील आहेत? ते वकील आपली बाजु घेतल्याशिवाय उत्तर कसे देतील? आपले वकील कोर्टात हजर नसतात.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण वकीलांना एवढे सगळे पैसे देतो. मग त्यांनी पैसे द्यायला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

आपण कॅव्हेटसाठी रु. ५००च्या मानधनाचा प्रस्ताव आणलेला आहे. परंतु, आतापर्यंत फक्त कॅव्हेट दिलेले आहे. मानधन दिलेले नाही.

**एस. ए. खान :-**

आपण आपल्या वकीलांना किती मानधन देतो? आपण किती पगार वाढ ठेवलेली आहे?

**मोहन पाटील :-**

आपण वकीलांना शासनाकडून मानधन देतो. आपण आता ज्या विधी सल्लागार नेमलेल्या आहेत. त्या आस्थापनेवर आहेत. परंतु, आपण आता जे १७ वकील ठेवलेले आहेत ते कुठल्या बेसवर ठेवलेले आहेत? ते मानधनावर ठेवलेले आहेत का? की दुसऱ्या कुठल्या बेसवर ठेवलेले आहेत ते सांगा.

**एस. ए. खान :-**

आपण रस्ता वगैरे केलेला आहे. त्या ठिकाणी बिल्डरने स्टे आणलेला आहे. परंतु, त्या भानगडीमध्ये कोणीही जात नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

बिल्डर कोर्टात स्टे आणतो तेव्हा आपला वकील कोर्टात हजर राहत नाही. म्हणून बिल्डरच्या बाजुने निकाल लागतो. आपल्या बाजुने निकाल लागत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, स्टे आणि स्टेटेस्कोमध्ये फरक आहे. त्यामुळे स्टे म्हणजे काय? आणि स्टेटेस्को म्हणजे काय ते सांगा.

**मा. सभापती :-**

आपण हा विषय खास करुन नंतर घेऊ या. आपल्याला त्याच्यासाठी कोर्टात किती प्रकरणे प्रलंबित आहेत. त्याचा सर्व्हे करावा लागेल.

**रतन पाटील :-**

तुम्ही तोपर्यंत हे मानधन चालू करणार आहात का?

**गजानन भोईर :-**

आपला मानधनाचा विषय चालू नाही. आपला सर्व्हेचा विषय चालू आहे.

**रतन पाटील :-**

त्यांनी 'ज' चा विषय दिलेला आहे तो वाचा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने विधी विभागाच्या अनुषंगाने खुलासा करतो की, मा. सर्वोच्च न्यायालय ते स्थानिक न्यायालयापर्यंत आपल्याला वेगवेगळ्या प्रकरणामध्ये न्यायालयीन कामकाजात सहभाग घ्यावा लागतो. काही वेळेला दैनंदिन कामकाजामध्ये आपल्यावर आक्षेप होतात. त्यावेळेला आपल्याला बाजु मांडावी लागते. या अनुषंगाने त्या ठिकाणी आपले विधी अभियोक्ता नेमावे लागतात किंवा स्थायी समितीने यापूर्वी जे पॅनेल निश्चित केलेले आहे. त्यामार्फत ती कार्यवाही केली जाते. आपण त्याच्यासाठी त्यांचे जे देयके निश्चित करतो त्यासाठी यापूर्वी स्थायी समितीच्या मान्यतेने जे निकष ठरवून दिलेले आहेत ते निकष आयुक्तांच्या मान्यतेने ती देयके प्रमाण केली जातात. परंतु, त्याच्यामध्ये स्थायी समितीचा उल्लेख नव्हता. याबाबत त्यांना जी देयके दिलेली आहेत त्याबाबत ऑब्जेक्शन आलेले आहे. त्यामुळे स्थायी समितीच्या सदर कॅव्हेट नमुद खर्चाला मान्यता असावी. ते रु. ५००/- होऊ शकत नाही. सुप्रीम कोर्टामध्ये एखादे कॅव्हेट दाखल करायचे असेल तर त्यावेळेला वेगळी फी राहणार आहे. त्याची जी रक्कम आहे ती मा. आयुक्त यांच्या

मान्यतेने वेगवेगळी निश्चित केली जाते. परंतु, कॅव्हेट हा शब्द त्याच्यामध्ये नसल्यामुळे त्याचा खर्च प्रलंबित ठेवलेला असतो. तो खर्च करित नाही. म्हणून या ठिकाणी हा प्रस्ताव मान्यतेसाठी आणलेला आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, आपले जे विधी अधिकारी आहेत. ते कॅव्हेट दाखल करणार नाहीत का? की वकीलांनी केले पाहीजे. प्रश्न तोच आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कॅव्हेट वकीलामार्फतच दाखल केले जाते.

**रतन पाटील :-**

परंतु, आपण त्यांना पगार देतो ना?

**जयंत पाटील :-**

तुम्हाला सल्लागाराचा अर्थ माहिती आहे का?

**रतन पाटील :-**

आम्हांला सल्लागाराचा अर्थ माहिती आहे. जर जो तुम्ही नियम दिला तो तुम्ही वाचून बघा ना.

**जयंत पाटील :-**

तुम्हीच वाचा ते नियम. सचिवांनी ते नियम लिहिलेले आहेत.

**रतन पाटील :-**

महापालिकेने आतापर्यंत ज्या ज्या केसेस केल्या तोपर्यंत मानधनाचा प्रश्न आला होता का? मग हा प्रश्न आताच का उपस्थित झाला?

**जयंत पाटील :-**

तो विषय नव्हता म्हणून हा विषय घेण्यात आला आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याचे बिल दिलेले आहे. पण त्या बिलाला ऑब्जेक्शन आलेले आहे आणि हा स्थायी समितीने त्यावेळी जो निर्णय घेतला होता तोच शब्द राहीलेला आहे. मी त्याचाच खुलासा करतोय.

**एस्. ए. खान :-**

प्रथम कॅव्हेट फाईल होऊ द्या. कॅव्हेट फाईल झाल्यानंतर स्टे मिळणार नाही.

**मिलन पाटील :-**

सभापती साहेब, आपण मानधनाचे नक्की करु. त्याच्या अगोदर आपण त्याच्या अटीशर्ती बघायला पाहिजे. आपण कॅव्हेट कशाला फाईल करतो की, आपलं कुठलेही म्हणणं जज साहेबांनी ऐकायला पाहिजे. महानगरपालिकेच्या तर्फे जी केस आपण पुट अप करणार आहोत ती संधी दिली जाते.

**जयंत पाटील :-**

तुम्हांला सांगायची गरज नाही.

**मिलन पाटील :-**

तर त्यावेळेला जे कॅव्हेट फाईल करणारे जे वकील लोक असतात ते प्रत्येक वकिल हजर राहत नाही. हजर न राहिल्याने काय होते की, अयोग्य निर्णय दिला जातो. हे ही तुम्हाला माहिती आहे. ज्यावेळेला वकील हजर नसेल त्यावेळचे मानधन त्याला द्यायचे नाही असे माझे म्हणणे आहे.

**मोहन पाटील :-**

तुमच्या मताशी मी सहमत आहे. पण जे अधिकारी त्या केसला जातात त्यावेळेला त्यांनी तसा त्या वकीलांबाबत रिपोर्ट करायला पाहिजे. आतापर्यंत तसा कुठल्याही अधिका-यांनी तसा रिपोर्ट केला आहे का?

**मिलन पाटील :-**

वकील का हजर राहत नाही? याचे कारण तुम्हाला माहित आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सभापतींच्या परवानगीने बोलतो की, मिरा भाईंदर महानगरपालिका स्थापन झाल्यापासून आपण आस्थापनेवर ठेका पध्दतीवर विधी सल्लागाराची नेमणूक केली होती. पण आता कायमस्वरुपी विधी सल्लागार आलेले आहेत. पुढच्या मिटींगला विधी समिती स्थापन झाल्याने पूर्ण कंट्रोलींग होईल. मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये सन्मा. सभापती आणि मिलन पाटील व सर्व सदस्यांनी एक चर्चा केली. त्या चर्चेमध्ये आपणांस पूर्ण माहिती होते की आपण काही करु शकत नव्हतो. तर आता विधी अधिकारी आस्थापनेमधून मंजुर झालेले आहे. मी जे विधी अधिकारी आहेत त्यांना सांगु इच्छितो की, कंन्स्ट्रक्शन विषयावर आपले लक्ष असायला पाहिजे. या ठिकाणी कोर्टाची नांवे सांगुन या मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये विविध क्षेत्रामध्ये विकास कामांना ज्या पध्दतीने स्टे घेतला जातो. स्टे घेतल्याने स्टेट्स जात नाही. स्टे असे सांगुन त्या समोरच्या माणसाला त्या ठिकाणी काम करु दिले जाते. परंतु, आपण त्यावर कुठलीही कारवाई करत नाही. मी विधी सल्लागार अधिका-यांना विनंती करतो की आपण त्यात लक्ष घालून योग्य ती कारवाई करण्यास अधिका-यांच्या दृष्टीस आणून द्यावे. आपण जी त्यांना नोटीस दिली त्यावर त्यांनी कोणत्या प्रकारची कारवाई केली त्याचा संपूर्ण तपशिल आपण घेतला पाहिजे. आम्ही आता काही मागवत नाही. पण पुढच्या वेळेला याची संपूर्ण माहिती मिळाली पाहिजे. कारण

मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये कायमस्वरुपी विधी अधिकारी नव्हते. मग आपण आता आस्थापनेवर आल्यावर याची खबरदारी दाखवली पाहिजे. अशा प्रकारची चॅलेंजींग कामे करा. चॅलेंज घेऊन काम करा. कारण कोणत्या वकीलाने माझी केस घेतलेली आहे. यापेक्षा वकिलाने केसमध्ये किती महत्व दाखवलेले आहे याला महत्त्व आहे. मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये किती अनधिकृत बांधकामे आहेत याची माहिती पुढच्या वेळेला घेऊन संपुर्ण तपशिलवार निवेदन करा. आम्हाला पूर्ण विश्वास आहे की, आपण आपली कामे जबाबदारीने, योग्यरितीने पार पाडाल. आम्हाला पूर्ण विश्वास आहे की आता आपली विधी समिती स्थापन होणार आहे. ॲड. एस. ए. खान त्या समितीचे सदस्य आहेत. यापुढे आम्ही मंजुरी देऊ. परंतु, अनधिकृत बांधकाम करताना स्टे मेन्टेन होता काम नये. जर एखाद्या केसवर अपिल आले असेल तर कुठल्याही केसवर अपिल येता कामा नये. याची आपण जबाबदारी घेतली पाहिजे. आपल्या मिरा भाईंदरचे क्षेत्र मोठे आहे. त्यामुळे आपण त्या क्षेत्राची जबाबदारी घेतली पाहिजे.

**केशव घरत :-**

आपल्या नगरपालिकेची लोक स्टे बोलले की पुढे जायला मागत नाही. तुम्ही विधी सल्लागार या नात्याने ह्या लोकांना 'स्टे'चा अर्थ समजावून सांगा.

**मा. सभापती :-**

आपले जे अधिकारी नगरपालिकेतर्फे कोर्टात हजर राहतात. तुम्ही त्यांना हजर होता की नाही याबाबत हजेरी तयार करायला सांगा. म्हणजे आपल्याला त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करता येईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्यांनी कोर्टामध्ये काय सादर केले?

**सुर्यकांत भोईर :-**

याची सर्व माहिती विधी सल्लागारांना घ्यायला सांगा. विधी सल्लागार ही सर्व माहिती घेतात का?

**रतन पाटील :-**

विधी सल्लागार किती स्टे आहेत? वगैरे सर्व गोष्टींची माहिती घेतील.

**मा. सभापती :-**

आपला जो विकासकर्ता बांधकाम करतो. त्याला स्टे म्हणजे जसे आहे तसेच बांधकाम ठेवायचे आहे तरच त्या ठिकाणी आपल्या बिल्डींग उभ्या राहतील असे त्याला समजावून सांगा.

**मिलन पाटील :-**

विधी सल्लागारांना मी सांगु इच्छितो की तुम्ही स्टेबाबतचा रिपोर्ट तात्काळ द्या. तुम्ही स्टेबाबत अतिक्रमण विभागाला लगेच लेखी कळवा. म्हणजे तुमची जबाबदारी संपली. तुम्ही ताबडतोब अतिक्रमण विभागाला दोघांच्या बाबतीत स्टेटस्को आहे. दोघांनीसुध्दा काम करायचे नाही असे कळवा. दोघांनासुध्दा मज्जाव करायचा. असे केल्यावर अतिक्रमणचे लोक अतिक्रमण विभागाचे काम करतील आणि तुम्ही मोकळे व्हाल.

**एस. ए. खान :-**

नयानगरला क्लिअरकट रस्ता आहे. बिल्डरने त्याला स्टेटस्को घेतलेला आहे. त्या रस्त्याला स्टेटस्को कसा मिळाला? ते मला सांगा. त्यावेळेला आपले वकील कोर्टामध्ये हजर होते का? याबाबतची सविस्तर माहिती विधी अधिकाऱ्यांनी पुढच्या मिटींगला द्यावी अशी मी त्यांना विनंती करतो. कारण नयानगरला गटाराचे काम बंद केलेले आहे आणि आपण त्या ठिकाणी डांबरीकरणाचा रस्ता करीत आहोत.

**रतन पाटील :-**

रस्ता तर आपलाच आहे.

**एस. ए. खान :-**

परंतु, तो बिल्डर माझ्या नावावर समन्स काढेल. मी यासाठी विधी अधिकाऱ्यांना सांगु इच्छितो की नयानगरचा रस्ता आणि गटाराचे काम बंद केलेले आहे. त्यामुळे तुम्ही सदर विषयाची सविस्तर माहिती घेऊन या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

नयानगरच्या रस्त्याचे काम चालू आहे. त्यांनी त्या ठिकाणी स्टेटस्को असल्याचे ॲप्रोच केलेले आहे. म्हणून रस्त्याचे काम बंद केलेले आहे.

**मा. सभापती :-**

जर आपल्याकडे असा विकासकर्ता असेल की आपण ज्याचे डी.पी.चे प्लॅन मंजुर केलेले आहेत. परंतु, तो विकासकर्ता नगरपालिकेच्या सार्वजनिक विकास कामांना अडथळा निर्माण करुन देत असेल तर अशा विकासकर्त्याचा प्लॅन पास करु द्यायचा नाही असे मला वाटते. आपल्याकडे जे मंदिर आहे आणि त्या मंदिरासमोर जो श्री. भरत जैनने रस्ता केलेला आहे. तो डी.पी.चा रस्ता आहे. त्याच्यावरसुध्दा स्टे घेतलेला आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सदरचा विषय मंजुर करण्यांत येत आहे.

(सन्मा. सदस्य श्री. मोहन पाटील यांनी ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, या ठिकाणी अनधिकृत बांधकाम बाबतचा विषय आला म्हणून मी बोलतो की, आपल्या शहरात ऐन गर्दीच्या ठिकाणी अनधिकृत बांधकामे चालू आहेत. शिवाय, ही अनधिकृत बांधकामे मेन रस्त्यावर चालू आहेत. मागच्या वेळेला अनधिकृत बांधकामाबाबत एक महिना वाद झालेला होता. परंतु, त्याच्यावर तोडगा निघालेला नाही. मग ही अनधिकृत बांधकामे अशीच चालू ठेवायची का?

**रतन पाटील :-**

आपण त्याबाबत गुन्हा दाखल करुया.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य केशव घरत यांनी अनधिकृत बांधकामाबाबत ऑलरेडी पत्र दिलेले होते.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

या ठिकाणी पाच-सहा मुद्दे चर्चेला आलेले होते. खासकरुन सन्मा. सदस्य केशव घरत यांनी मुद्दा मांडलेला होता. ज्या ठिकाणी गॅरेजसाठी परवानगी घेतलेली होती त्या वर्सोवाच्या ठिकाणी काम चालू आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

घोडबंदर रोडला थोडं पुढे जाऊन राईट साईडला रोबीन मीलजवळ अनधिकृत बांधकाम चालू आहे.

**मा. सभापती :-**

पुढे कुठे?

**सुर्यकांत भोईर :-**

हायवेवर जो तबेला आहे. त्या ठिकाणी अनधिकृत बांधकाम चालू आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

वेस्टर्न हॉटेलच्या अपोझीट असलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत तुम्ही बोलता ना.

**केशव घरत :-**

वेस्टर्न हॉटेल पुढे गेले. घोडबंदरला हायवेने जाताना पुढे रस्ता जातो तेथील रोबीन मिलच्या बाजुला असलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत आमचे म्हणणे आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तिथे गॅरेज दुरुस्तीसाठी परवानगी आहे.

**जयंत पाटील :-**

घोडबंदरला रोड जातो तिथे कुठे?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

घोडबंदरला जो मधे रस्ता जातो. त्याच्या कॉर्नरला असलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत बोलत आहे.

**केशव घरत :-**

दुसरे म्हणजे वर्सोवा येथील एक्सप्रेस हॉटेलच्या पाठीमागे असलेल्या अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करावी.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

एक्सप्रेस हॉटेलच्या पाठीमागे पत्रे लावलेले आहेत.

**केशव घरत :-**

मी तबेल्याच्या साईडला असलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत बोलत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

शेल्टर हॉटेलच्या टर्निंगला असलेले अनधिकृत बांधकाम तोडलेले होते. आता ते बांधकाम पुन्हा चालू झालेले आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ज्या अधिका-याकडे तो विषय असेल तोच अधिकारी तो विषय हॅन्डल करेल. दुसरी कोणीही व्यक्ती मधे जाऊन विषय हॅन्डल करु शकत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तसेच, काशिमिरा रोडला हटकेश उद्यानापसून सिल्व्हर पार्कच्या नाक्यापर्यंत राईट साईडला जी काही अनधिकृत बांधकामे झालेली आहेत आणि आता जी अनधिकृत बांधकामे चालू आहेत त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी.

**मिलन पाटील :-**

साहेब, शिवार मंदिराच्या बाजुला असलेले अनधिकृत बांधकाम सर्व्हिस रोडमध्ये बांधलेले आहे ते बांधकाम बरेच दिवस बंद होते आणि आता पुन्हा सुरु झालेले आहे. तिथे एक स्लॅबसुध्दा झालेला आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही शिवार मंदिरजवळ असलेल्या बांधकामबाबत बोलता का?

**मिलन पाटील :-**

मी शिवार मंदिराच्या पुढे राईट साईडला असलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत बोलतो.

**रमेश जैन :-**

पद्मावती नगरमे सात माले का अनधिकृत बांधकाम किया है।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही आता तुम्हाला जे पाच-सहा अनधिकृत बांधकामाबाबत सांगितलेले आहेत. आम्हाला याची सविस्तर माहिती पुढच्या बैठकीत हवी आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी हा विषय चर्चेला जाण्यापूर्वी हा मुद्दा मांडलेला होता आणि पुढच्या बैठकीला अनधिकृत बांधकामाची माहिती दिली जाईल असे मा. सभापती साहेबांनी निर्देश दिलेले होते. संबंधित अधिकाऱ्यांनी अनधिकृत बांधकामा विषयाचे प्वाईन्ट लिहून घेतलेले आहेत. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी ३१ तारखेच्या बैठकीमध्ये अनधिकृत बांधकामा विषयीचा खुलासा करावा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, संबंधित अधिकाऱ्यांना विचारा की तुम्हाला ३१ तारखेपर्यंतची मुदत सफिशन्ट आहे का? नाही तर आम्हाला वेळ नव्हता असे अधिकारी बोलतील.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

अनधिकृत बांधकामाचा विषय मा. आयुक्त साहेब इन्डिपेन्डन्टली बघतात. शिवाय, मी आजच्या कामकाजाची माहिती मा. आयुक्त साहेबांना देणार आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

अनधिकृत बांधकामाचा विषय पेन्डिग राहणार आहे. असे आम्ही समजायचे आहे का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

अनधिकृत बांधकामाचा विषय पेन्डिग राहणार नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आज तुम्ही ज्या खुर्चीवर बसलेले आहात. ती मा. उपायुक्तांची खुर्ची आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

परंतु, संबंधित अधिकाऱ्यांकडून कार्यवाहीबाबतचे निर्देश घ्यावे लागतील.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही हे बांधकाम लिगल आहे किंवा हे बांधकाम इललिगल आहे असे सांगा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आम्ही ३१ तारखेच्या मिटींगमध्ये सविस्तर माहिती देतो.

**सुर्यकांत भोईर :-**

मी सार्वजनिक बांधकाम विभागाला कमर्शियल बांधकामाबाबत कळविलेले आहे. अशा कमर्शियल परवानग्या आहेत का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कमर्शियल परवानग्या दिलेल्या आहेत.

**नरेंद्र चव्हाण :-**

ज्या ठिकाणी बोर्ड लावले जातात. तिथे परमिशन देतात.

**प्रेमनाथ पाटील :-**

परंततु, या कमर्शियल परवानग्या कुठल्या बेसवर देतात? ते सांगा. आमच्याकडे नियम नसल्यामुळे या कमर्शियल परवानग्या कुठल्या बेसवर देतात? ते आम्हाला माहिती नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

रिझर्वेशनच्या बेसवर जागा दिलेली आहे. मग तुम्ही कमर्शियल परवानग्या कशा देता?

**प्रेमनाथ पाटील :-**

अधिनियम १९४९ च्या कुठल्या नियमाप्रमाणे कमर्शियल परवानग्या देता येतात? ते सांगा.

**सुर्यकांत भोईर :-**

कुठल्या नियमानुसार कमर्शियल परवानग्या देता येतात? ते सांगा.

**जयंत पाटील :-**

तुम्ही डी.सी. रुलप्रमाणे कमर्शियल परवानग्या दिलेल्या आहेत का?

**नरेंद्र चव्हाण :-**

डी.सी रुलप्रमाणे कमर्शियल परवानग्या दिलेल्या आहेत.

**प्रकरण क्र. ६३ :-**

कॅव्हेटच्या संदर्भात मानधन आकरण्यांस मंजुरी देणे.

**ठराव क्र. ६५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे मा. न्यायालयात दाखल करण्यात येणाऱ्या केव्हेट करीता रू. ५००/- प्रति कॅव्हेट असे मानधन अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत अनधिकृत बांधकामे, अतिक्रमण याबाबत मा. न्यायालयात मोठ्या प्रमाणावर दावे प्रलंबित असल्याने सदर दाव्याचा लवकरात लवकर निकाल लावून पुढील कारवाई करणे कामी विधि विभाग सक्षम होणे गरजेचे असल्याने आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सदर विधि विभागातील कामकाजाचे नियोजन करावे, त्याकरिता जादा वकीलांची आवश्यकता लागल्यास त्यांची नेमणूक करणे, त्यांची फी ठरविणे, व्यवस्थित रित्या दावे न हाताळणाऱ्या वकीलांना पॅनेल वरून काढून टाकणे, विधि विभागामार्फत मा. न्यायालयात जाऊन दररोज पाठपुरावा करणे कामी आवश्यक असणारे Legal Assistant नेमणे इ. कामास तसेच येणाऱ्या खर्चास मुजूरी देण्यात येत आहे. मा. आयुक्त यांनी आवश्यक ती सर्व कार्यवाही करून विधि विभागाचे कामकाज नियंत्रित करावे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. एस. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग व मनपा कर्मचारी वर्ग यांचे हार्दिक आभार मानुन आजची सभा संपल्याचे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ०२.०० वाजता.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**